# <u>उंट . Camel.</u>

एका शहरातल्या प्राणिसंग्रहालयात (Zoo) मध्ये एक उंट व त्याचे पिल्लू असते . एक दिवस उंटाचे पिल्लू आईला म्हणते की मला काही प्रश्न विचारायचेत . आई (उंट) आश्र्चर्यचकीत होते व म्हणते विचार की .
पिल्लू विचारते की आपल्या पाठीवर हा उंचवटा का ? (याला वशिंड म्हणतात) उंट म्हणतो की आपण वाळवंटात असल्यामुळे आपले पाणी व खाणे याच्यात साठविलेले असते . डोळयावर जाड पडदा का ? पिल्लू परत विचारते की आपले पाय उंच का ? आई सांगते की आपल्याला वाळवंटात त्यामुळे व्यवस्थित चालता येते . पिल्लू विचार करू लागते आणि पटकन विचारते की मग आई तू व मी वाळवंटात असायला पाहिजे होतो .आपण येथे Zoo मध्ये काय करतोय ? काय मित्रांनो पिल्लाने बिनतोड प्रश्न विचारला ना ? उंटाचे बोलणे मला कसे समजले हा मुद्दा क्षणभर बाजूला ठेवूया व पिल्लाच्या प्रश्नाकडे वळूया .

आपल्याला लक्षात येईल की आपले शिक्षण , अनुभव यांचा योग्य उपयोग होईल जर ते योग्य ठिकाणी असेल तरच . आपण जर का डोळसपणे बघितले तर अशी कितीतरी उदाहरणे दिसतील की माणूस शिकतो एक व नोकरी / कामधंदा दुस–याच क्षेत्रातील करतो . आज नाटयसृष्टीवर नजर टाकली तर असे दिसेल कि कितीतरी डॉक्टर मंडळी वैद्यकिय शिक्षण घेऊन प्रथित यश नट झाले आहेत .

माझ्या स्वतःच्या माहितीत काही डॉक्टर व्यवसाय करत आहेत . काही मुले हौशीने Production Engineer होतात . पण मग shop floor वर काम करायला नाखूष असतात . कारण कामगारांकडून काम करून घेणे सर्वानाच जमेल असे नाही . पण हा विचार शिक्षण / course निवडताना केला जात नाही .

एखादा मुलगा Chemical Engineer घेतो पण नोकरी जमत नाही कारण लहानपणापासून त्याला दम्याचा त्रास असतो व कारखान्यातील वास त्याला सहन होत नाहीत .
एखादा तरूण शिक्षण पूर्ण झाल्यावर चांगली नोकरी मिळत नाही म्हणून शिक्षकाचा पेशा स्वीकारतो . पण मुलांचा आवडता शिक्षक होऊ शकत नाही कारण हा पेशा त्याने नाईलाजाने घेतलेला असतो .
Fashion Parade च्या जगात वावरणारी एक विवाहीत model तर डॉक्टर आहे .

हल्लीच्या स्पर्धेच्या जगात कमी शिकलेल्या ( Graduate फक्त ) मुला मुलींना पोटासाठी मिळेल ते काम करावे लागते . एक वेळ हे समजण्यासारखे आहे . पण उच्च शिक्षण घेताना आपल्या मनाचा , आवडीचा , शरीर क्षमतेचा कल विचारात घेणे गरजेचे आहे . असे केले तरच आपण घेतलेल्या परिश्रमाचे , सरकारने दिलेल्या सुविधेचे व समाजाचे चीज होईल असे मला वाटते .

मित्रांनो तुमच्या पाहण्यात अशी काही मंडळी असतीलच . हा लेख वाचल्यावर परत एकदा निरखून पहा त्यांच्याकडे .